# बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ जून –२०१९

| | | |
|---|---|---|
| ०१ | डी.बी.मार्ग पोलीस ठाणे परिमंडळ–२ | गु.र.क्र. ३१७/२०११, कलम ३०२,३६४,२०१,१२०(ब),३४ भा.द.वि. |

**"खून करण्याच्या उद्द्शाने अपहरण करुन खूनाचा पुरावा नष्ट करणे"**

गुन्हयाची थोडक्यात हकिकत:– शुक्रवार, दि. १८/११/२०११ रोजी, डॉ. दा.भ. मार्ग पोलीस ठाण्यात हार्दिक धिरूभाई मोरडिया, वय २१ वर्षे हा दि. १७/११/२०११ रोजी १८.३० वाजेनंतर ऑपेरा हाउस येथुन हरविलेल्याची तक्रार, त्याचा मोठा भाऊ तक्रारदार श्री. बिपिन मोरडिया याने दिली होती. त्याअनुषंगाने या पोलीस ठाणेमार्फत त्यांचा शोध सुरु करण्यात आला.

शनिवार, दि. १९/११/२०११ रोजी सकाळी १०.२५ वा. दरम्यान पाचगणी पोलीस ठाणे, सातारा जिल्हा, हद्दित एक अनोळखी मृतदेह सापडला असून त्याची तेथे अपमृत्यू नोंद क्र. ००/११ कलम १७४ सी.आर.पी.सी. अन्वये नोंद घेण्यात आली. सदरवेळी मृतदेहाचे मानेला फास आवळल्याचा व्रण आणि मानेच्या डावे बाजुला धारधार हत्याराने जखम झाली असल्याचे व त्याचे मृतदेहाजवळ सापडलेल्या ओळखपत्रात तो मुंबईतील भारत डायमंड ब्रुस कंपनी, ऑपेरा हाउस, मुंबई येथे नोकरी करीत असल्याचे निर्दशनास आले. पाचगणी पोलीस ठाणे यांनी सदर कंपनीच्या मालकाचा मुलगा श्री पार्थ मेहता याचेशी संपर्क साधुन त्याला मयताचे नातेवाईकासह पाचगणी, सातारा, येथे बोलविले असता, सदर कंपनीच्या मालकाचा मुलगा श्री पार्थ मेहता यानी सदरचा मृतदेह ओळखुन तो त्यांचेकडे नोकरीस असलेला इसम नामे हार्दिक धिरुभाई मोरडीया याचा असल्याचे पोलीसांना सांगितले.

पाचगणी पोलीस ठाणे येथील पुढील चौकशी दरम्यान, श्री पार्थ मुकेश मेहता यांनी नमूद मयत इसम हा हरविलेल्याबाबतची तक्रार, शुक्रवार, दि. १८/११/२०११ रोजी, डॉ. दा.भ. मार्ग पोलीस ठाणेत दिली असल्याची तसेच मयत इसम याचे ऑपेरा हाउस हिरे बाजार येथून अपहरण झाले असावे असा संशय व्यक्त केला. श्री पार्थ मुकेश मेहता, यांचे फिर्यादीवरून पाचगणी पोलीस ठाणे, सातारा, येथे गुन्हा नोंद क्र. ००/२०११, कलम ३०२,३६४,२०१,३४ भा.द.वि.सं. अन्वये नोंदविण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :– | श्री. पार्थ मुकेश मेहता, वय २१ वर्षे, धंदा– हिरे व्यापार |
| बळीत/मयत | :– | हार्दिक धिरूभाई मोरडिया, वय २१ वर्षे. |
| आरोपी अटक व दिनांक | :– | १) धर्मेश वल्लभभाई पटेल, वय ३३ वर्षे.<br>२) नरेश प्रभुभाई गोलानी, वय ३२ वर्षे.<br>१) दि. २७/११/२०११,<br>२) दि. २४/११/२०११ |
| चेरीस गेलेला माल | :– | एकूण ७२५.५२ कॅरेट वजनाचे लहान मोठे आकाराचे हिरे किंमत रुपये १,२५,००,०००/–(अक्षरी एक करोड पंचवीस लाख रूपये) |
| हस्तगत माल | :– | एकूण ७२५.५२ कॅरेट वजनाचे लहान मोठे आकाराचे हिरे किंमत रुपये १,२५,००,०००/– (अक्षरी एक करोड पंचवीस लाख रूपये) |
| निकाल दिनांक | :– | २६ व २७/०६/२०१९ |
| दोषसिध्दीचा तपशील | :– | मा. सत्र न्यायालयाने यातील दोन्ही अटक आरोपीतास पुढीलप्रमाणे गंभीर शिक्षांची सुनावणी आहे.<br>१) भारतीय दंड विधान संहिता कलम ३०२, ३४ भा. द. वि. मध्ये दोन्ही आरोपीतांना प्रत्येकी आजन्म कारावास व रोख रूपये १०,०००/– दंडाची शिक्षा व न भरल्यास एक वर्ष कारावासाची शिक्षा सुनावली आहे.<br>२) भारतीय दंड विधान संहिता कलम १२०(ब), ३४ भा.दं.वि. मध्ये दोन्ही |

| | | |
|---|---|---|
| | | आरोपीतांना प्रत्येकी आजन्म कारावास व रोख रूपये १०,०००/—दंडाची शिक्षा व न भरल्यास एक वर्ष कारावासाची शिक्षा सुनावली आहे.<br>३) भारतीय दंड विधान संहिता कलम २०१, ३४ भा.दं.वि. मध्ये दोन्ही आरोपीतांना प्रत्येकी ०७ वर्षे सक्तमजुरी व रोख रूपये ५,०००/—दंडाची शिक्षा व न भरल्यास एक वर्ष कारावासाची शिक्षा सुनावली आहे.<br>४) भारतीय दंड विधान संहिता कलम ३९७, ३४ भा.दं.वि. मध्ये दोन्ही आरोपीतांना प्रत्येकी ०७ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे.<br>५) भारतीय दंड विधान संहिता कलम ३६४, ३४ भा.दं.वि. मध्ये दोन्ही आरोपीतांना प्रत्येकी १० वर्षे सक्तमजुरी व रोख रूपये ५,०००/— दंडाची शिक्षा व न भरल्यास सहा महिने कारावासाची शिक्षा सुनावली आहे. |

- **तपास कौशल्य** :— सदर गुन्हयातील फिर्यादी आणि मयत हार्दिक मोरडिया हे ऑपेरा हाऊस परिसरातील संबधित व्यापाऱ्यांना दि. १७/११/२०११ रोजी सांयकाळी हिऱ्यांच्या पुडयांचे वाटप करताना एकमेकांच्या संपर्कात होते. मात्र तिसऱ्या व्यापाऱ्याला हिऱ्याचे वाटप झाल्यानंतर फिर्यादींचा आणि मयताचा ऐकमेकांच्या भ्रमणध्वनीद्वारे संपर्क सांयकाळी १८.३० वाजल्यापासुन तुटला. कारण मयताचा भ्रमणध्वनी त्यावेळेपासुन सतत बंद असल्याचे फिर्यादीच्या लक्षात आले होते. सदरवेळी केलेली चौकशी व तपासावरून वरील नमूद मयत इसमाचे अपहरण हे त्याचेकडे असलेल्या किंमती हिऱ्यांकरीता झालेले असावे असे स्पष्ट झाले. त्याप्रमाणे नमुद मयत इसम हा वापरत असलेल्या भ्रमणध्वनीचा तपशिल तयार करुन तो तपासुन पाहत असताना, नरेश प्रभुभाई गोलानी, वय ३२ वर्षे, रा.ठि. मनिष अपार्टमेंट, ए विंग, रुम नं. १९, दुसरा माळा, अगासी रोड, दळवी हॉस्पीटलच्या बाजुला, विरार (प), जिल्हा ठाणे याचा त्यामध्ये सहभाग असल्याचा संशय आल्याने त्याचा शोध घेण्यात आला. व त्यास मिरा रोड, ठाणे जिल्हा, येथून ताब्यात घेण्यात आले.

- नमुद इसम नरेश गोलानी याचेकडे पोलीस ठाण्यात केलेल्या तपास/चौकशी दरम्यान, तो पाहिजे आरोपीसह ऑपेरा हाऊस येथे हिरे दलालीचे काम असल्याचे व मयताच्या परिचयाचा असल्याचे निष्पन्न झाले. अटक आरोपी आणि इतर पाहिजे आरोपी यांनी मयताकडील अंदाजे सव्वा कोटी रुपये किंमतीचे हिरे एका ग्राहकास विकण्याच्या बहाण्याखाली मयताकडून घेतले. ते हिरे ग्राहकांना दाखविण्याच्या बहाण्याखाली मयत इसमाचे मुंबई येथून अपहरण केले. त्यास मुंबईहुन माथेरान व तेथून पाचगणी, सातारा, येथे नेवुन, त्याचा गळा आवळुन, तसेच गळयावर धारदार शस्त्राने वार करुन त्याचा खुन केला व पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह तेथील जंगलातील झाडा झुडपात टाकुन दिल्याची माहिती उघडकिस आली. म्हणुन नरेश गोलानी यास सदर गुन्हयात दि. २४/११/२०११ रोजी १७.१० वाजता अटक करण्यात आली.

- त्यानतंर सदर गुन्हयातील पाहिजे आरोपी नामे धर्मेश पटेल यांस गुन्हे प्रकटिकरण शाखा, युनिट—२, मुंबई यांनी अटक केली. सदर आरोपीतास ताब्यात घेवून दोन्ही आरोपीतांकडे गुन्हयाचे अनुषंगाने अधिक चौकशी करून गुन्हयातील चोरलेली मालमत्ता एकूण ७२५.५२ कॅरेट वजनाचे लहान मोठे आकाराचे हिरे किंमत रुपये १,२५,००,०००/—(अक्षरी एक करोड पंचवीस लाख रूपये) हे विरार येथील अटक आरोपी नरेश गोलानी याचे राहते घरातून पंचनाम्याअंतर्गत हस्तगत करण्यात आले.

- सदरचा संवेदनशील गुन्हा उघड झाल्याने मा. पोलीस आयुक्तांनी माहे जुन—२०१९ चे बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ या पारितोषिकाने खालील अधिकारी व कर्मचारी यांना सन्मानित केले आहे.

➢ डी.बी. मार्ग पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | हुद्दा | संपुर्ण नांव |
|---|---|---|
| **1** | पोलीस निरीक्षक | श्री. मनोज श्यामसुंदर हिर्लेकर |
| **2** | पोलीस निरीक्षक | श्री. पांडूरंग गेणूबा सणस |
| **3** | पोलीस उप निरीक्षक | श्री. वाल्मिक अंबादास ढोरकुले |
| **4** | पोलीस उप निरीक्षक | श्री. प्रकाश भिवा कदम |
| **5** | पो.शि.क्र. ०९०८१९ | श्री. सुदर्शन शशिकांत जवंजाळे |

✪✪✪✪✪✪✪